# पर्यटकांची सुरक्षितता महत्वाची

## मालवणात वॉटर स्पोर्टस् ट्रेनिंगचा शुभारंभ

▶ मालवण / वार्ताहर

पर्यटकांच्या जिवावर आर्थिक उन्नती साधताना त्यांची सुरक्षितता महत्वाची आहे. समुद्रातील कोणताही पर्यटन व्यवसाय करताना अधिकृतरित्या प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. मच्छीमार युवकांनी वॉटर स्पोर्टस्चे प्रशिक्षण घेऊन याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना समुद्रातील वॉटर स्पोर्टस्च्या थराराचाही आनंद उपलब्ध करून द्यावा, असे प्रतिपादन जनशिक्षण संस्थानचे रोहिदास कदम यांनी केले.

जनशिक्षण संस्था, मानव साधन विकास संस्था आणि जिजाई पर्यटन कला क्रीडा साहित्य व सांस्कृतिक अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने येथील हॉटेल दर्यासारंग येथे आयोजित करण्यात आलेल्या वॉटर स्पोर्टस् ट्रेनिंग कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवारी सकाळी झाले. हे ट्रेनिंग दहा दिवस चालणार आहे. यात देवबाग ते तळाशिल येथील तीस मच्छीमार युवकांनी सहभाग घेतला आहे. त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम मानव साधन विकास संस्थेच्या सौ. उमा प्रभू यांनी उपलब्ध करून दिली आहे.

प्रास्ताविक गुरुनाथ राणे यांनी केले. मालवण तालुक्यातील किनारपट्टीवर वॉटर स्पोर्टस् व्यवसाय चालविण्यासाठी अनेकजण



**मालवण : जनशिक्षण संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या वॉटर स्पोर्टस् ट्रेनिंगच्या शुभारंभप्रसंगी बोलताना रोहिदास कदम. बाजूला अन्य मान्यवर.** समीर म्हाडगूत, मालवण

इच्छुक आहेत मात्र परिपूर्ण प्रशिक्षण अगर प्रमाणपत्रधारक एकही व्यक्ती उपलब्ध होत नसल्याने याठिकाणी या व्यवसायाला चालना मिळत नाही. त्यामुळे माजी खासदार सुरेश प्रभू व सौ. प्रभू यांचे याकडे लक्ष वेधले असता, त्यांनी यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच जनशिक्षण संस्थेलाही यासाठी कार्यक्रम आखण्याच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे पणजी–गोवा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्टस् यांच्या सहकार्याने मालवणात पहिल्यांदाच वॉटर स्पोर्टस् ट्रेनिंग कार्यक्रम आयोजित करण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

यावेळी व्यासपिठावर ल्युपिन फाऊंडेशनचे योगेश प्रभू, विजय केनवडेकर, मार्गदर्शक श्री. शिंदे व श्री. साळगावकर, जिजाई संस्थेचे अध्यक्ष आनंद जामसंडेकर आदी उपस्थित होते. स्वागत श्री. परुळेकर यांनी केले.

पर्यटकांना जलपर्यटनाचा आनंद उपलब्ध करून देताना सुरक्षितता, इंजिन, इंधन याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पुस्तकी ज्ञानाने शिकलेलीच व्यक्ती प्रशिक्षणात उत्तीर्ण होईल असेही नाही, न शिकलेली व्यक्तीही या प्रशिक्षणात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊ शकते. मिळालेल्या प्रशिक्षणातून दर्जेदार विद्यार्थी बाहेर पडून आपला व्यवसाय सुरू करू शकणार आहेत, असे श्री. शिंदे म्हणाले.

मच्छीमार व्यवसायाबरोबरच पर्यटनातून रोजगार निर्मितीसाठी वॉटर स्पोर्टस् एक चांगला पर्याय युवा मच्छीमारांसमोर आहे. प्रशिक्षण घेण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. फक्त युवकांनी पुढे येऊन प्रशिक्षणात सहभागी व्हावे, असे श्री. प्रभू म्हणाले. आभार श्री. राणे यांनी मानले.

# बांदा येथे गायत्री महायज्ञ

▶ बांदा / प्रतिनिधी

गायत्रीतीर्थ, शांतिकुंज, हरिद्वाराच्या तत्वावधानात अखंड ज्योतीच्या हिरक जयंतीनिमित्त गायत्री परिवार गोवा व बांदा ग्रामस्थांतर्फे येथील श्री भूमिका देवी मंदिर येथे १२ ते १४ डिसेंबर या कालावधीत २४ यज्ञकुंडांचा गायत्री महायज्ञ व संगीतमय यज्ञपुराण कथा यांचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ डिसेंबर रोजी दुपारी तीन ते सायंकाळी सात कलशयात्रा प्रवचन व प्रसाद कलशयात्रा बांदेश्वर मंदिर ते बाजारपेठमार्गे भूमिकादेवी मंदिर, १३ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १ या वेळेमध्ये २४ कुंडांचा महायज्ञ व हवन प्रसाद, सायंकाळी ४.३० ते ७.३० संगीतमय प्रज्ञापुराण कथा, १४ रोजी सकाळी ९ ते दु. वेळेत २४ कुंडांचा महायज्ञ व प्रसाद, सायंकाळी ४.३० ते संगीतमय प्रज्ञापुराण कथा, डिसेंबर रोजी सकाळी ९ ते वेळेत २४ कुंडांचा महायज्ञ व पूर्णाहुती, महाप्रसाद, दुपारी ते सात वा. संगीतमय प्रज्ञा कथा, क्षमापन व दीपयज्ञ. बालसंस्कार, गर्भसंस्कार, नाम (उष्टावळी, अन्नग्रहण) जन्म विद्यारंभ, यज्ञोपारित धारण, दि संस्कार केले जाणार आहेत.

नाव नोंदणीसाठी प्रकाश (०२३६३–२७०२५२) यां संपर्क साधावा. भाविक, नागरि सहभाग घेऊन लाभ घ्यावा, आवाहन करण्यात येत आहे.

# परुळेत क्रांतिकारक व राष्ट्रपुरुषांचे चित्रप्रदर्शन

▶ परुळे / वार्ताहर

हिंदू जनजागृती समितीच्यावतीने परुळे येथील कै. अण्णासाहेब देसाई विद्यामंदिरच्या सभागृहात १३ डिसेंबर रोजी ...






सकाळ बुधवार, १२ डिसेंबर २०१२

# जलक्रीडा प्रशिक्षणाचे मालवण येथे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

मालवण, ता. ११ : 'प्रशिक्षित युवक तयार करण्याचे काम जनशिक्षण संस्था करीत आहे. जलक्रीडा प्रशिक्षणाच्या माध्यमातून कोकणातील तरुणांना चांगल्या मार्गाने पैसा मिळविण्याचे साधन उपलब्ध करून दिले जाणार आहे,' असे प्रतिपादन जनशिक्षण संस्थेचे संचालक रोहिदास कदम यांनी आज येथे केले.

धुरीवाडा येथील चिवला बीच येथे मानव साधन विकास संस्था मुंबई, माजी खासदार सुरेश प्रभू पुरस्कृत आणि जिजाई पर्यटन विकास संस्था व जनशिक्षण संस्था जिल्हा यांच्यावतीने आठ दिवसांच्या मोफत जलक्रीडा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याच्या उद्‌घाटन समारंभास लुपिन फाऊंडेशनचे योगेश प्रभू, जनशिक्षण संस्थेचे मालवण समन्वयक दत्तात्रय परुळेकर, जिजाई पर्यटन संस्थेचे विजय केनवडेकर, गुरुनाथ राणे, प्रशिक्षक संजय शिंदे, गौरेश साळगावकर यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.




मालवण : येथील धुरीवाडा भागात जलक्रीडा प्रशिक्षण शिबिरात जनशिक्षण संस्थेचे संचालक रोहिदास कदम यांनी मार्गदर्शन केले.

(छायाचित्र : राजेश पारधी)

श्री. शिंदे म्हणाले, "प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षणार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. येथे येणाऱ्या सर्वच पर्यटकांना पोहता येत नाही. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षा कशी घ्यावी, याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे." श्री. प्रभू म्हणाले, "जलक्रीडा प्रकारात तरुणांना रोजगार मिळविण्यास भरपूर वाव आहे. केवळ मासेमारीवर अवलंबून न राहता उत्पन्नाची नवीन साधने निर्माण करायला हवीत. मच्छीमारांमध्ये समुद्रातील कौशल्ये असतात; मात्र तांत्रिक माहिती नसते. त्यामुळे या प्रशिक्षणाच्या निमित्ताने आपल्या तांत्रिक चुका सुधारण्याचे काम करावे." आठ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ३० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत. दोन बॅचमध्ये त्यांना पॉवर बोट हँडलिंग, लाईफ सेव्हिंग, टेक्निक फॉर वॉटर, स्पोर्टस् ऑपरेटर यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.